पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई CB 23/2026

प्रेसनोट

| गुन्हे शाखा, नवी मुंबई | दिनांक १५/०४/२०२६ |
|---|---|

**''वेश्या व्यवसायातुन ०७ पिडीत महिलांची गुन्हे शाखेतील पोलीसांनी केली सुटका''**

पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, सह पोलीस आयुक्त, श्री.संजय येनपुरे, अपर पोलीस आयुक्त, गुन्हे, श्री.दीपक साकोरे, पोलीस उप आयुक्त, गुन्हे शाखा, श्री.सचिन गुंजाळ यांनी नवी मुंबई पोलीस आयुक्तालयाचे परिसरात अनैतिक व्यापार, अवैध धंदे यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत.

त्याअनुषंगाने अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्षाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. पृथ्वीराज घोरपडे यांना दिनांक १४/०४/२०२६ रोजी त्यांचे गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की,''स्पा पॅलेस स्पा'' प्लॉट नंबर ०४, शॉप नंबर ०७, सेक्टर १५, त्रिशुल गोल्डमाईन, डेकॅथलॉनच्या मागे, सीबीडी, बेलापुर, नवी मुंबई येथील मॅनेजर/ मालक ही बॉडी मसाजसाठी असलेल्या ग्राहकांना ९०००/—रूपये दर सांगुन कमी जास्त रक्कम घेवुन मसाजच्या नावाने तेथे असलेल्या महिलांकडुन जबरदस्तीने वेश्याव्यवसाय करून घेत आहे.''

वपोनि/घोरपडे यांनी त्यांना मिळालेल्या बातमीप्रमाणे बनावट ग्राहकास ''स्पा पॅलेस स्पा'' येथे पाठवले. बनावट ग्राहकाच्या सांकेतीक इशाऱ्यावरून पथकाने छापा टाकला. त्याठिकाणी ०७ पिडीत महिला वेश्यागमनाकरीता ठेवलेल्या मिळून आल्या. स्पाची मॅनेजर/मालक नितु हजारीलाल प्रजापत, वय ३३ वर्षे हिने ०७ पिडीत महिलांना बॉडी मसाज करण्याचे नावाने प्राप्त करून, नमुद शॉप हा वेश्या व्यवसायाकरीता वापरून, पिडीत मुलींना वेश्या व्यवसायासाठी बनावट ग्राहकास दाखवून व्यवसायाचा मोबदला म्हणून ८५००/— रूपये स्विकारले. म्हणुन तिचे विरूध्द एन.आर.आय. पोलीस ठाणे येथे गु.रजि.नं. १११/२०२६ भा.न्या.सं.कलम १४३ (३), ३(५) सह अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा कलम १९५६ चे कलम ३, ४, ५ अन्वये दिनांक १५/०४/२०२६ रोजी गुन्हा दाखल केला आहे. सदर गुन्हयातील महीला मॅनेजर/ मालक हिस अटक केली असुन तिची दिनांक १८/०४/२०२६ रोजी पावेतो पोलीस कोठडी मंजुर आहे. **सुटका करण्यात आलेल्या महिलांपैकी ०४ महिला थायलंड देशातील तसेच ०२ मिझोराम व ०१ मणिपुर राज्यातील रहिवाशी आहेत.** गुन्हयाचा पुढील तपास एन.आर.आय. पोलीस ठाणे करत आहे.

सदरची उल्लेखनिय कारवाई सहा.पोलीस आयुक्त, धर्मपाल बनसोडे, AHTU, गुन्हे शाखा यांचे मार्गदर्शनाखाली वपोनिरी/पृथ्वीराज घोरपडे, सपोनि/योगेश देशमुख, सपोनि/राजश्री शिंदे, पोउपनिरी/सरिता गुडे, पोहवा/२५०७पावडे, पोना/२९८४ भोये पोशि २६५४ ठाकुर, पोशि/३०९२ चव्हाण, पोशि/३२३९ पारासुर, पोशि/३४५२ कोलते, पोशि/४४४५ पाटील तसेच चालक पोहवा/मोहिते यांनी केली आहे.

★★★★★★★★★★


पोलीस आयुक्तालय, नवी मुंबई
सहाय्यक पोलीस आयुक्त
व
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्ष
गुन्हे शाखा, नवी मुंबई